CMYK

राज्यातील ३ महत्वकांक्षी रस्ते प्रकल्पांच्या कामांना ब्रेक ; भूसंपादन प्रक्रिया रद्द >> पान 2

पांढरकवडा पोलिसांची गोवंश तस्करी व मांस वाहतुकीवर मोठी कारवाई >> पान 3

नगर परिषद रिसोड -नगर पथविक्रेता समिती निवडणूक बिनविरोध >> पान 4


**सुविचार**

जीवनातील काही पराभव हे विजयाहूनही अधिक श्रेष्ठ असतात.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034


या कारणामुळे बदलली अजय देवगणच्या 'रेड २'ची रिलीज डेट!

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 36 ■ गुरूवार, दि. 12 सप्टेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# रविकांत तुपकरांची सरकार सोबतची बैठक सकारात्मक

## ■ सोयाबीन-कापूसप्रश्नी केंद्रीय मंत्री अमित शहांकडे राज्य सरकारचे शिष्टमंडळ जाणार

## ■ बहूतांश मागण्या मान्य...पण रिझल्ट मिळेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार - रविकांत तुपकर

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बुलडाणा** : शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी रविकांत तुपकर यांची उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारसोबत आज ११ सप्टेंबर रोजी झालेली बैठक सकारात्मक झाली आहे. बहुतांश मागण्या राज्य सरकारने मंजूर केल्या आहेत, हे आमाच्या आंदोलनाचे यश आहे परंतु आम्ही पूर्णपणे समाधानी नाही, रिझल्ट मिळेपर्यंत लोकशाही मार्गाने आंदोलन सुरुच ठेवणार असल्याचे रविकांत तुपकर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

सोयाबीन - कापूस दरवाढ, पिकविमा,अतिवृष्टीची १०० % नुकसान भरपाई, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती, जंगली जनावरांपासून सरंक्षणासाठी शेतीला मजबूत कंपाऊंड यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रविकांत तुपकर यांनी सिंदखेडराजा येथे अन्नत्याग आंदोलन केले होते. या आंदोलनाची दखल घेत राज्य सरकारच्या वतीने त्यांच्यासमवेत ११ सप्टेंबर रोजी बैठकीचे आयोजन केले होते. मंत्रालयात ११ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळ बैठकीत सहभागी झाले होते तर राज्य सरकारच्या वतीने ना.दिलीप वळसे पाटील, ना.अब्दुल सत्तार, ना.अनिल पाटील, यांच्यासह नियोजन, वित्त,कृषी, सहकार,मदत व पुनर्वसन, रोजगार हमी, उद्योग व ऊर्जा विभागाचे सचिव व लआ. डॉ.राजेंद्रजी शिंगणे या बैठकीला उपस्थिती होते. तब्बल दोन तास ही बैठक चालली. या बैठकीत रविकांत तुपकरांनी




शेतकऱ्यांच्या मागण्या आणि समस्या सविस्तरपणे मांडल्या. या बैठकीनंतर प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना रविकांत तुपकर यांनी सांगितले की, सोयाबीन- कापसाची दरवाढ किती आवश्यक आहे हे आम्ही बैठकीत राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिले. सोयाबीन - कापसाच्या दरवाढीबाबत देशाचे गृहमंत्री ना. अमित शहा यांच्याकडे राज्यसरकारचे एक शिष्टमंडळ दिल्लीला जाईल केंद्र सरकारशी चर्चा सोयाबीन-कापूस दरवाढीसाठी सकारात्मक निर्णय घेवू, असा शब्द सरकारच्या वतिने ना.अजित पवार यांनी दिला. सोयाबीन - कापसाच्या दरवाढीसाठी राज्यसरकार केंद्र सरकारशी बोलायला तयार झाले हे आमच्या आंदोलनाचे यश असल्याचे तुपकरांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना व महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेमध्ये अनेक >> पान २

## देशातील दोन बड्या बँकांना आरबीआय चा दणका,कोट्यावधी रुपयांचा दंड,

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बँकिंग क्षेत्रातून एक मोठी बातमी समोर आली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ ने देशातील दोन बड्या बँकांवर मोठी कारवाई केली आहे. आरबीआय ने खासगी क्षेत्रातील एचडीएफसी बँक ॲक्सिस बँकेला नियमांचे पालन न केल्याबद्दल कोट्यवधी रुपयांचा दंड ठोठावला आहे. याबाबतचे प्रसिद्धपत्रक देखील देण्यात आले आहे. >> पान २

## उद्धव ठाकरेंची वाटचाल सहानभुतीकडून अनुभूतीकडे?

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राच्या राजकारणातलं एक मोठं नाव स्वर्गीय बाळासाहेब ठाकरेंचे सुपुत्र असल्याने नेहमीच त्यांचं नाव आदराने घेतलं जायचं.. मात्र सध्याच्या राजकारणात ठाकरेंची वाटचाल सहानभुतीकडून अनुभूतींकडे जात असल्याचे चित्र आहे. त्याला कारण आहे मागील काही वर्षात आणि खास करून २०१९ नंतर घडलेल्या राजकीय घडामोडी आणि उलथापालथी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेने शिवसेना आणि भाजपा महायुतीला स्पष्ट कौल दिला होता. भाजपला १०५ जागा आणि शिवसेनेला ५६ जागा असे १६१ जागांचे बहुमत महायुतीला मिळाले. पण परिस्थितीचा अचूक फायदा घेत उद्धव ठाकरेंनी काँग्रेस - राष्ट्रवादीशी संधान साधले आणि थेट मुख्यमंत्री बनले. उद्धव यांना ना धड सरकार चालवता आले, ना पक्ष टिकवता आला. पण महाराष्ट्राच्या राजकारणात चिरंतन टिकणारी अस्थिरता ठाकरेंनी निर्माण केली.

भाजपच्या पाठीत खंजीर खुपसल्याचा आरोप उद्धव ठाकरेंवर करण्यात आला. मात्र आज त्याच दगाबाजीची फळे उद्धव ठाकरेंना भोगावी लागत आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस आणि राष्ट्रवादीकडून सातत्याने उद्धव ठाकरेंना अपमानित करण्यात येत आहे. एकीकडे उद्धव ठाकरेंनी भाजपवर सडकून टीका करत परतीचे दोर कापून टाकलेत. आणि हाच मुद्दा पकडून महाविकास आघाडीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी कडून ठाकरेंना आणखी कोंडीत पकडलं जात आहे. उद्धव ठाकरेंना सुद्धा नाईलाजाने तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. >> पान २

## ऐन सणासुदीत बळीराजा सुखावला!

### कांद्याच्या दरात झाली मोठी वाढ



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : ऐन गणेशोत्सवात कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी एक मोठी दिलासादायक बातमी समोर आलेली आहे. ती म्हणजे आता कांद्याच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे. किरकोळ बाजारात कांद्याचे दर हे ८० रुपयांपर्यंत पोहोचलेले आहेत. त्याचप्रमाणे सरासरी कांद्याचे दर पाहिले तर आपण ५० रुपये किलोच्या आसपास आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे कांदा आहे. त्या शेतकऱ्यांचे आता चांगले दिवस येणार आहेत. कांद्याचा बाजारामध्ये दर वाढल्याने आता शेतकऱ्यांना याचा चांगलाच आर्थिक फायदा होणार आहे. परंतु सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला मात्र चांगलाच फटका बसण्याची शक्यता आहे. सरकार कांद्याचे दर कमी करण्यासाठी अनेक उपाययोजना करत आहेत. परंतु कारल्याचे दर दिवसेंदिवस वाढत चालत दिसत आहेत.

सरकार सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी आणि कांद्याचे दर कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु अनेक शहरांमध्ये कांद्याचे >> पान २

## आरक्षण संपवण्याचा काँग्रेसचा मनसुबा

### एकनाथ शिंदेंनी राहुल गांधींना सुनावलं

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : काँग्रेस नेते राहुल गांधी सध्या अमेरिका दौऱ्यावर असून एका कार्यक्रमात बोलताना आरक्षणाबद्दल वेगळं मत व्यक्त केलं. जेव्हा योग्य वेळ येईल, त्यावेळी काँग्रेस आरक्षण संपविण्याचा विचार करेल. पण सध्यातरी अशी स्थिती नाही असं राहुल गांधी म्हणाले होते. त्यांच्या या विधानावर भाजप आक्रमक झाली असतानाच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही टीका करत राहुल गांधींना सुनावलं आहे. आरक्षण संपवण्याचा मनसुबा राहुल गांधींनी व्यक्त केला मात्र आम्ही आरक्षण संपवू देणार नाही, असं एकनाथ शिंदे यांनी ठणकावून सांगितलं.

याबाबत एकनाथ शिंदे यांनी ट्विटर करत म्हंटल, विदेशात जाऊन सातत्याने भारताची ,येथील नागरिकांची बदनामी करण्याचा उद्योग विरोधी पक्षनेते, लोकप्रतिनिधी राहुल गांधी करतात. परदेशात जाऊन मनाला येईल ते बरळणे, बेछूट आरोप करणे लोकप्रतिनिधीला शोभत नाही. मात्र बोलताना त्यांनी काँग्रेसचा आरक्षणविरोधी खरा चेहरा उघड केला.आरक्षण संपवण्याचा मनसुबा काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत व्यक्त केला आहे. आरक्षण संपवण्याची भाषा करणारे राहुल गांधी यांचे हे वक्तव्य अत्यंत दुर्दैवी आहे. शिवसेना व महायुतीतील सहकारी पक्ष आम्ही आरक्षणाच्या बाजूने आहोत आणि आरक्षण संपवू देणार नाही, याची ग्वाही पुन्हा या निमित्ताने देत आहोत. आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणताही प्रयत्न आम्ही हाणून पाडू.

आपला भारत देश ही 'फेअर प्लेस' नाही, असे परदेशात जाऊन तिथल्या विद्यार्थ्यांसमोर बोलणं हे भारतातील नागरिकांसाठी अत्यंत अवमानकारक आहे. राहुल गांधी हे परकीय मानसिकतेलाच धार्जिणे आहेत, हे या निमित्ताने सिद्ध होते. अनेक सर्वसामान्य भारतीय विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर आपल्या बुद्धितेजाने लोकांची मने जिंकली आहेत. स्वामी विवेकानंदांपासून ते आजच्या आयटी क्षेत्रातील बुद्धिमंत विद्यार्थ्यांपर्यंत अनेकांनी अमेरिकेत भारताचा ध्वज उंचावला आहे. त्या सगळ्यांचा अवमान राहुल गांधी यांनी केला आहे. देशाचा, आमच्या अस्मितांचा आणि नागरिकांचा अपमान आम्ही कधीही सहन करणार नाही आणि मान्यही होणार नाही. राहुल गांधी यांच्या वक्तव्याचा मी निषेध करतो असं म्हणत एकनाथ शिंदे यांनी राहुल गांधींवर निशाणा साधला.




पंडितजी, कृपया माझा हात बघा आणि मला सांगा की यावेळी घोटाळा होण्याची शक्यता आहे की नाही?

## राज्यातील एकमेव लाकडी गणपती खामगावात

### १३० वर्षांपूर्वी मानाच्या लाकडी गणपतीची प्राणप्रतिष्ठा नवसाला पावणारा मानाचा गणपती

दैनिक आपला विदर्भ

**खामगाव/प्रतिनिधी** :नवसाला पावणारा मानाचा गणपती म्हणून बुलडाणा जिल्ह्यातील खामगावच्या लाकडी गणपतीचा महाराष्ट्रभर नावलौकिक आहे.या मानाच्या लाकडी गणपतीची प्राणप्रतिष्ठा सुमारे १३० वर्षांपूर्वी झाली दर गणेश चतूर्थीपासून अनंत चर्तुदशी पर्यंत या मंदिरात दर्शनार्थी व धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते.

हा लाकडी गणपती विसर्जन मिरवणूकीनंतर पुन्हा मंदिरात स्थापित करण्याची १३० वर्षांपासूनची परंपरा आजही सुरू आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव मधील १३० वर्ष आधीची ही आहे लाकड़ी गणपती मूर्ति खामगाव शहरा मधून वाहनाऱ्या बोर्डि नदी मध्ये ही मूर्ति संपूर्ण लाकडाची असल्याने सुमारे १३० वर्ष पूर्वी वाहत आली होती.

त्यावेळी नागरिकांनी ती पकडून मूर्तिचि स्थापना केली आज रोजी या मूर्तिला मानाचा गणपती म्हणून जिल्ह्यात ओळखले जाते.

गणेशोत्सवात या मूर्तिचि स्थापना झाल्या नंतरच इतर इतर मुर्त्यांची स्थापना केली जाते विसर्जन करतांना सर्वात पुढे मानाचा गणपती असतो दहा दिवस या मूर्तीच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी असते दहाव्या दिवसी मिरावणुकी नंतर या मुर्तीची पुन्हा मंदिरात स्थापना केली जाते ही मूर्ति विसर्जित केली जात नाही हे विशेष.



या नवसाला पावणाऱ्या लाकडी गणपतीच्या दर्शनासाठी खामगांवात महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात व छत्तीसगडवरून मोठया प्रमाणावर भाविक भक्त येतात. शिव व पेशवेकाळात सुमारे १३० वर्षांपूर्वी महाराष्ट्रात इतरत्र कुठे नसेल अशा आखीव व रेखीव लाकडी गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

## आंध्रप्रदेशात मिनी ट्रक पलटला; अपघातात ७ जणांचा मृत्यू

देवरापल्ली रू आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्यात मिनी ट्रक उलटून ७ जणांचा मृत्यू झाला. ही घटना देवरापल्ली मंडलातील चिन्नईगुडेममधील चिलाका पाकला भागात मंगळवारी मध्यरात्रीनंतर २ वाजेच्या सुमाराला घडली. पूर्व गोदावरी जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नरसिंह किशोर यांनी याबाबत माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काजूने भरलेला मिनी ट्रक टी नरसापुरम मंडलातील बोरामपालम येथून निदादावोलू मंडलातील ताडीमल्लाकडे जात होता. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रक उलटला. अपघातानंतर काजूच्या गोण्यांखाली दबल्यामुळे लोकांचा मृत्यू झाला. पोलिस आणि स्थानिकांनी पोत्याखालून मृतदेह बाहेर काढून पोस्टमॉर्टमसाठी शासकीय रुग्णालयात नेले. मृतांमध्ये देबाबत्तुला बुरैया (४०), तम्म रेड्डी सत्यनारायण (४५), पी. चिन्मुसलय (३५), कट्टाव कृष्णा (४०), कट्टावा सत्तीपांडू (४०), तडीमल्ला येथील तड्डी कृष्णा (४५) आणि कटकोटेश्वर येथील समिश्रगुडेम मंडल यांचा समावेश आहे.


CMYK

## २५ वर्षानंतर पाकची कबुली

जी गोष्ट पाकिस्तान आजवर नाकारीत आला ती गोष्ट पाकिस्तानने २५ वर्षानंतर का होईना अखेर मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिक दिनाच्या निमित्ताने पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना मान्य केली. पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी पाकिस्तानी सैनिकांना संबोधित करताना १९९९ साली झालेल्या कारगिल युद्धात मारले गेलेल्या पाकिस्तानी सैनिकांच्या बलिदानाची आठवण काढत त्यांना श्रध्दांजली वाहिली आणि २५ वर्षापासून पाकिस्तान जी गोष्ट नाकारीत आलाय त्याची न कळत कबुली दिली. १९९९ साली भारताचे तत्कालीन पंतप्रधान अटबिहारी वाजपेयी यांनी पाकिस्तानशी मैत्री करण्यासाठी मैत्रीचा हात पुढे केला. दोन्ही देशात पन्नास वर्षापासून सुरू असलेला तणाव कमी करण्यासाठी वाजपेयींनी प्रामाणिक प्रयत्न केले. दोन्ही देशांचे संबंध सुधरावेत म्हणून त्यांनी दिल्ली लाहोर बस सेवा सुरू केली . दोन्ही देशात सौहार्दाचे वातावरण निर्माण झाले आणि कटुता कमी झाली असे वाटत असतानाच पाकिस्तानने आपला मूळ रंग दाखवला आणि भारताचा विश्र्वासघात केला. १९९९ च्या कडाक्याच्या थंडीत जम्मू काश्मीर मध्ये बर्फ पडत असल्याचा फायदा घेऊन कारगिल मधील उंचावर असलेल्या कारगिलमध्ये घुसखोरी करून बंकर उभारले आणि त्यात पाकिस्तानी सैनिकांना घुसवले. त्यांनी कारगिलच्या बऱ्याच भागात अतिक्रमण केले आणि तो भूभाग बळकावत भारतीय सनिकांवर आक्रमण केले. भारतीयांसाठी हा मोठा धक्का होता कारण पाकिस्तान असा विश्र्वासघात करेल असे कोणालाच वाटले नव्हते शिवाय कारगिल मधील परिस्थिती भारतीयांसाठी अनुकूल नव्हती. शत्रुसैन्य उंचीवर असल्याने शत्रू सैन्याच्या गोळीबाराचा मुकाबला करत आल्या सैनिकांना पहाडावर चढावे लागत होते. भारतीय सैन्य अतिशय विपरीत परिस्थितीत शत्रूला धैर्याने तोंड देत होते पण परिस्थिती अनुकूल नव्हती अखेर केंद्र सरकारने हवाई दलाला पाचारण केले. हवाई दलाने लेझर बॉम्बने पाकिस्तानी सैनिकांचे बंकर उध्वस्त केले. कॅप्टन विक्रम बात्रा व त्यांच्या युनिटने मोठी मर्दुमकी गाजवून पाकड्यांना भारताबाहेर हुसकावून लावले. दोन महिने चाललेल्या या युद्धात पाकिस्तान नामोहरम झाला. या युद्धात भारताचे अनेक जवान शहीद झाले. भारताने पाकड्यांना कारगिल मधून हुसकावून लावल्यावर भारतीय सैन्य पाकिस्तानमध्ये घुसेल अशी भीती वाटू लागल्यावर पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांनी थेट अमेरिका गाठत अमेरिकेला मध्यस्ती करण्याची विनंती केली. अमेरिकेच्या मध्यस्ती नंतर भारताने युद्ध थांबवले. या युद्धात पाकिस्तानची नाचक्की झाली पण पाकिस्तानने कारगिल मध्ये घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैनिक नसून मुजाहिदीन असल्याची आरोळी ठोकली. आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तान कायम हेच सांगत आला की कारगिल मध्ये पाकिस्तानी सैन्य नव्हतेच भारताने मात्र त्याचा कायम प्रतिवाद करत घुसखोरी करणारे पाकिस्तानी सैन्यच असल्याची ठाम भूमिका घेतली. पाकिस्तान मात्र हे नाकारीत राहिला. पण म्हणतात ना सत्य केंव्हा ना केंव्हा तरी मान्य करावीच लागते. आता २५ वर्षानंतर का होईना पाकिस्तानने सत्य मान्य केले. पाकिस्तान विश्र्वास घातकी आहे असे भारत आंतरराष्ट्रीय समुदायाला जे सांगत आलाय ते २५ वर्षानंतर का होईना पण खरे ठरले.

# राज्यातील ३ महत्वकांक्षी रस्ते प्रकल्पांच्या कामांना ब्रेक ; भूसंपादन प्रक्रिया रद्द

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारने राज्यात अनेक महत्वाचे रस्ते प्रकल्प हाती घेतले आहेत. यापैकी महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाच्या कामाला ब्रेक लागणार आहे.राज्यातल्या अनेक भागांमधून शेतकऱ्यांमधून शक्तिपीठ महामार्गाला भूसंपादनासाठी नकार देण्यात आला आहे. एवढेच नाही तर काही शेतकऱ्यांनी आंदोलनाचा पवित्रा देखील घेतला आहे.

नागपूर ते गोवादरम्यान प्रस्तावित करण्यात आलेल्या शक्ती पीठ महामार्ग प्रकल्पाच्या विरोधात राज्यातील शेतकऱ्यांमध्ये मोठा रोष निर्माण झाला होता पश्र्चिम महाराष्ट्रात आणि मराठवाडा त्या प्रकल्पाला मोठ्या प्रमाणात विरोध झाला या विरोधामुळे मराठवाड्यात महायुतीला देखील फटका बसल्याचे पाहायला मिळालं म्हणूनच शक्तिपीठ महामार्गाचे भूसंपादन थांबवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

शक्तिपीठ महामार्गाबरोबर महाराष्ट्रातील आणखी दोन महत्त्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आली. शक्तिपीठ महामार्गाबरोबरच पुणे नाशिक औद्योगिक महामार्ग आणि सिंदखेडराजा शेगाव भक्तीपीठ मार्गाची भूसंपादन प्रक्रिया सुद्धा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे प्रकल्प सुमारे २५ ते ३० हजार कोटी रुपये खर्चाचे आहेत.

एमएसआरडीसीने महाराष्ट्रातील सुवर्ण त्रिकोणातील दोन महत्त्वाची शहरे म्हणजेच पुणे आणि नाशिक या दरम्यानचा प्रवास वेगवान व्हावा यासाठी पुणे-नाशिक औद्योगिक महामार्ग तयार करण्याचा निर्णय घेतला होता. या महामार्गाची लांबी जवळपास २१३ किमी एवढी प्रस्तावित होती. या महामार्गामुळे दोन शहरांचे अंतर केवळ दोन तासांत पार होईल असा दावा केला जात होता. महत्वाचे म्हणजे या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुद्धा सुरू करण्यात आली होती. मात्र आता ही प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे.

राज्य रस्ते विकास महामंडळाने सिंदखेडराजा ते शेगाव दरम्यान भक्तीपीठ महामार्ग प्रस्तावित केला. समृद्धी महामार्गाचा विस्तार करण्यासाठी हा महामार्ग प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला होता. या महामार्ग प्रकल्पामुळे समृद्धी महामार्गावरून तीर्थक्षेत्र शेगावला अतिजलद वेगात जाता येणार होते. हा १०९ किमी लांबीचा 'भक्तीपीठ महामार्ग' प्रकल्प चार पदरी राहणार होता. या प्रकल्पाच्या संरेखनास सुद्धा सरकारने मान्यता दिली होती. तसेच, भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्याची तयारी झाली होती. मात्र आता या प्रकल्पाचे भूसंपादन देखील रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# या कारणामुळे बदलली अजय देवगणच्या 'रेड २'ची रिलीज डेट!

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** अजय देवगणकडे सध्या एकामागून एक चित्रपटाची लाईन लागलेली आहे. त्याच्या आगामी चित्रपटांच्या यादीत 'सिंघम अगेन', 'सन ऑफ सरदार २', 'दे दे प्यार दे २' आणि 'रेड २' यांसारख्या मोठ्या चित्रपटांच्या नावांचा समावेश आहे. पण या चित्रपटांबाबत अजय देवगणसमोरील मोठे आव्हान त्यांच्या प्रदर्शनाच्या तारखा सांभाळणे हे आहे. म्हणजे प्रत्येक चित्रपट अशा प्रकारे प्रदर्शित करणे की त्याच्या कमाईवर पुढील १५-२० दिवस इतर कोणत्याही चित्रपटाच्या प्रदर्शनाचा परिणाम होणार नाही. 'रेड २' आधी १५ नोव्हेंबरला थिएटरमध्ये येणार होता, आता निर्मात्यांनी आपला निर्णय बदलला आहे. त्यांनी 'रेड २'ची रिलीज डेट पुढे ढकलली आहे.

'रेड २'मध्ये अजय देवगण एका प्रामाणिक आयआरएस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे जो भ्रष्टाचाराविरोधात मोहीम राबवतो. या चित्रपटात अजयशिवाय रितेश देशमुख आणि वाणी कपूर यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. चित्रपट शूटिंगसाठी फ्लोरवर गेला आहे. निर्मात्यांनी चित्रपटाच्या पोस्टरसह घोषणा केली होती की हा चित्रपट नोव्हेंबरमध्ये थिएटरमध्ये दाखल होणार आहे. मात्र आता या चित्रपटाची नवीन रिलीज डेट समोर आली आहे. आता 'रेड २' २१ फेब्रुवारी २०२५ रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी काही दिवसांपूर्वी बॉलीवूड हंगामाला पुष्टी केली होती की 'रेड २' रिलीज पुढे ढकलण्यात येणार आहे.



राजकुमार गुप्ता यांनी पुष्टी केली की 'रेड २' पुढच्या वर्षी येत आहे. या निर्णयामागे अजय देवगणचा 'सिंघम अगेन' हेही कारण मानले जात आहे. खरंतर, रोहित शेट्टी २०२४ च्या दिवाळीच्या मुहूर्तावर त्याचा पुढचा कॉप युनिव्हर्स चित्रपट 'सिंघम अगेन' प्रदर्शित करणार आहे. म्हणजे १ नोव्हेंबरच्या आसपास. तर निर्मात्यांनी यापूर्वी 'रेड २' ची रिलीज डेट १५ नोव्हेंबर ठेवली होती. अशा स्थितीत 'सिंघम अगेन'वर त्याचा परिणाम होऊ शकतो. 'सिंघम अगेन' ५०० कोटींहून अधिकचा व्यवसाय करू शकतो, असे मानले जात आहे. अशा परिस्थितीत, चित्रपटगृहांमध्ये हा चित्रपट प्रदर्शित होण्यासाठी पूर्ण वेळ देण्यासाठी 'रेड २' च्या प्रदर्शनाची तारीख बदलण्यात आली आहे.

मात्र, 'सिंघम अगेन'ची थेट स्पर्धा कार्तिक आर्यनच्या 'भूल भुलैया ३'शी होणार आहे. कार्तिकच्या 'भूल भुलैया २' ने बॉक्स ऑफिसवर शानदार कमाई केली. 'भूल भुलैया ३' आणि 'सिंघम अगेन' एकाच वेळी प्रदर्शित झाल्यामुळे दोन्ही चित्रपटांच्या कमाईवर मोठा परिणाम होऊ शकतो. दोन्ही चित्रपटांकडून ५००-५०० कोटींची कमाई अपेक्षित आहे. दोन्ही चित्रपटांचे निर्मातेही दोन्ही चित्रपटांचा संघर्ष वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण रोहित शेट्टी स्पष्टपणे सांगतो की तो सिंघम अगेन या दिवाळीतच चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करणार आहे. 'सिंघम अगेन' हा या वर्षातील सर्वात मोठा चित्रपट मानला जात असून, यात अजय देवगण व्यतिरिक्त दीपिका पदुकोण, अक्षय कुमार, अजय देवगण, टायगर श्रॉफ, जॅकी श्रॉफ, करीना कपूर खान आणि अर्जुन कपूर महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत.

# कल्याणमध्ये महिला पत्रकारावर लैंगिक अत्याचार

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याणमध्ये एका २९ वर्षाच्या महिला पत्रकारावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी एका साप्ताहिक आणि यूट्यूब वाहिनीच्या पत्रकाराविरोधात उल्हासनगरमधील मध्यवर्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिला विवाहित असतानाही आरोपी तिला लग्नासाठी गळ घालत होता. त्यास तिने नकार दिल्याने आरोपीने तिच्या पतीला मारण्याची धमकी देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे पोलीस तक्रारीत म्हटले आहे.

पीडित महिला पत्रकाराच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी पत्रकाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार आणि आरोपी पत्रकार हे कल्याणमध्ये राहतात. पोलिसांनी सांगितले, पीडित महिला या पत्रकार आहेत. त्या आरोपी पत्रकाराच्या यूट्यूब वृत्त वाहिनीमध्ये नोकरी करतात. आरोपी पत्रकाराने या महिलेशी कार्यालयात काम करत असल्याने ओळख वाढवली. तिच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले. त्याने पीडित महिलेला लग्न करण्याची गळ घातली. तिला सौदी अरेबियात पर्यटनासाठी नेण्याची तयारी दर्शवली. लग्नानंतर पलावा गृहसंकुलात अलिशान घर घेण्याचे आमिष आरोपी पत्रकाराने महिलेला दाखविले.

आपले लग्न झाले आहे. आपणास मुले आहेत. त्यामुळे तुमच्याशी लग्न करू शकत नाहीत, असे वारंवार पीडित महिला आरोपीला सांगत होती. आरोपी ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. लग्नाचे आमिष दाखवून, पलावा गृहसंकुलात घर घेण्याचा बहाणा करून आरोपी पत्रकाराने पीडितेला कल्याण, उल्हासनगर परिसरातील लॉजवर नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले. आरोपी पत्रकाराकडून पीडित महिलेला सतत लग्नाची मागणी करण्यात येऊ लागली. हे शक्य नसल्याने एक दिवस पीडित महिला पत्रकाराने आरोपीला तुमच्या वृत्त वाहिनीचे काम आपण सोडत असल्याचे सांगितले. त्याचा राग आरोपी पत्रकाराला आला. त्याने आपल्या वृत्त वाहिनीचे काम सोडले तर आपण तुझ्यासह तुझ्या पतीला मारू, अशी धमकी दिली.

पीडित महिलेने सुरुवातीला मानपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली. हा गुन्हा नंतर उल्हासनगर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला.

पान १ वरून...

## रविकांत तुपकरांची सरकार

शेतकऱ्यांचे पैसे सरकारकडे बाकी आहेत. या दोन्ही योजनांचे पैसे आम्ही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करतो, असा शब्द राज्य सरकारच्या वतीने ना.अजित पवार यांनी दिला असल्याचे तुपकर म्हणाले. शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीबाबत मात्र सरकार सकारात्मक नाही, असेही तुपकर म्हणाले. आणि अतिशय महत्त्वाची मागणी शेडनेटच्या संदर्भात नुकसान भरपाई बाबत आता लवकरच स्वतंत्र धोरण आणणार असल्याचेही ना. पवार यांनी सांगितले. शेतकऱ्यांना पिकविम्याची रक्कम देण्यास टाळाटाळ आणि विलंब करणाऱ्या कंपन्यांवर कडक कारवाई करण्याचेही आश्र्वासन या बैठकीत उपमुख्यमंत्री ना. पवार यांनी दिले.

१५ सप्टेंबरपर्यंत राज्यातले खरीपाचे आणि ३० सप्टेंबरपर्यंत सगळ्या कंपन्या रब्बीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करतील तसेच अतिवृष्टीची नुकसान भरपाई आचारसंहिता लागण्यापूर्वी देण्याचा शब्द या बैठकीत देण्यात आला. अमरावती- नागपूर पट्ट्यात संत्रा- मोसंबीची मोठी गळती झाली आहे, त्याचे तातडीने पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याचे आश्र्वासन ना.पवार यांनी दिले. केंद्र सरकारकडे घरकुलाचे अनुदान, तुषार सिंचन, ठिबक ,कृषी अवजारांचे अनुदान तसेच इतर विविध योजनांचे अनुदान थकलेले आहे त्याबाबतीत देशाचे गृहमंत्री ना.अमित शहा यांच्या भेटीत चर्चा करु असा शब्दही राज्य सरकारच्या वतीने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी रविकांत तुपकरांना दिला. सिंदखेडराजा ते शेगाव हा भक्तीमार्ग रद्द करण्याची अधिसूचना लवकरच काढण्याचा शब्द उपमुख्यमंत्र्यांनी यांनी दिला असून जंगली जनावरांच्या त्रासापासून मुक्तता होण्यासाठी शेतीला मजबूत कंपाऊंडची योजना कॅबीनेटमध्ये आणू तसेच शेतमजुरांसाठी स्वतंत्र मजुर महामंडळ स्थापन करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेणार, नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अनुदान देण्यासाठी निधी उपलब्ध करुन देऊ, यानंतर पेरणीपूर्ण पिककर्ज उपलब्ध करून न देणाऱ्या बँकांवर कडक कारवाई करू असाही शब्द यावेळी उपमुख्यमंत्री ना.पवार यांनी दिला आहे. ही बैठक शेतकऱ्यांसाठी सकारात्मक ठरली असून हे आमच्या आंदोलनाचे बहूतांशी यश आहे, असेही यावेळी रविकांत तुपकर यावेळी सांगितले.

यावेळी रविकांत तुपकरांच्या शिष्टमंडळात ड.शर्वरी तुपकर, डॉ. ज्ञानेश्र्वर टाले, शेतकरी योद्धा श्री बालाजी सोसे गजानन कावरखे, नामदेव पतंगे, सतीश इडोळे, बालाजी मोरे, राजीव कसबे, दयाल राऊत, कुलदीप करपे, किरण ठाकरे, सुरेश गवळी,शिवाजी माने, डॉ.विनायक वाघ, विनायक सरनाईक, श्याम अवथळे, बाळू शेवाळे, प्रकाश गीते, कैलास मेहेत्रे, भारत वाघमारे, नितीन राजपूत, मुकेश वाघ, राम अंभोरे, श्रीराम चलवाड, सहदेव लाड, शुभम राऊत, पवन गाढवे, अनिल लांडगे, रवी वंगवाड, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

रिझल्ट मिळेपर्यंत आंदोलन सुरूच राहणार; आंदोलनाची दिशा दोन दिवसात ठरवणार - रविकांत तुपकर

आजच्या बैठकीत बहुतांश मागण्या मान्य झाल्याने बैठक शेतकऱ्यांसाठी सकारात्मक ठरली. पण जोपर्यंत रिझल्ट येत नाही, जोपर्यंत मागण्यांसंदर्भात शेतकऱ्यांच्या पदरात ठोस काही पडत नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहणार आहे. यापुढे कोणत्या पद्धतीने आंदोलन करायचे,पुढील दिशा काय राहणार आहे हे दोन दिवसांत ठरविणार. मध्यप्रदेशमध्ये जसे आंदोलन सुरु आहे तसेच आंदोलन महाराष्ट्रातही होईल. टप्प्या टप्प्याने आणि लोकशाही मार्गाने आम्ही आंदोलन करणार असल्याचे रविकांत तुपकरांनी सांगितले.

## देशातील दोन बड्या बँकांना

एचडीएफसी बँक ही देशातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी बँक आहे. तर दुसरी ॲक्सिस बँक आहे. मध्यवर्ती बँकेने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करण्यात हलगर्जीपणा केल्याबद्दल रिझर्व्ह बँकेने दोन्ही बँकांवर ही कारवाई केली आहे. अशा परिस्थितीत जर तुमचेही या बँकेत खाते असेल तर ही बातमी तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. आरबीआयने एक प्रसिद्धीपत्रक जारी करून या संदर्भात माहिती दिली आहे.

दोन्ही बँकांवर २.९१ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. रिझर्व्ह बँकेने मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात निष्काळजीपणा करणाऱ्या सर्व लहान-मोठ्या बँकांवर कठोर कारवाई सुरूच ठेवली आहे. बँकांकडून ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या सेवांमध्ये निष्काळजीपणाची प्रकरणे समोर आल्यानंतर दंडाची ही कारवाई करण्यात आल्याचे आरबीआयने म्हटले आहे. यामध्ये केवायसी, ठेवींवरील व्याजदर आणि इतर बाबींचाही समावेश आहे.

ॲक्सिस बँकेला का ठोठावला दंड ?

रिझर्व्ह बँकेने खासगी क्षेत्रातील ॲक्सिस बँकेवर सर्वाधिक दंड ठोठावला आहे, जो १.९१ कोटी रुपये आहे. बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट, १९४९ (बीआर ॲक्ट) च्या कलम १९ (१) (ए) च्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे हा दंड ठोठावण्यात आला असल्याचे त्यात म्हटले आहे. याशिवाय ठेवींवरील व्याजदर, केवायसीसह कृषी कर्जाशी संबंधित काही सूचनांचे पालन न केल्याबद्दल ॲक्सिस बँकेला मोठा दंड ठोठावण्यात आला आहे.

एचडीएफसी बँकेवर का केली कारवाई?

रिझर्व्ह बँकेने एचडीएफसी बँकेला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. प्रसिद्धी पत्रकात असे सांगण्यात आले की, एचडीएफसी बँकेवर ठेवीवरील व्याजदर, बँकेशी संबंधित वसुली एजंट आणि बँक ग्राहक सेवेसाठी निर्धारित मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्याबद्दल दंड आकारण्याची कारवाई करण्यात आली आहे.

बँक ग्राहकांवर परिणाम होणार का?

एचडीएफसी बँक आणि ॲक्सिस बँकेवर लावण्यात आलेल्या दंडाच्या माहितीसोबतच, बँकांच्या ग्राहकांवर याचा काय परिणाम होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. वैधानिक आणि नियामक अनुपालनातील त्रुटींमुळे ही कारवाई करण्यात आल्याचे आरबीआयने म्हटले आहे. यामुळे बँकांनी त्यांच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर परिणाम होणार नाही.

## उद्धव ठाकरेंची वाटचाल

महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रीपद सांभाळत असतानाच उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या होत्या. सरकार तर त्यांना चालवता येत नव्हतेच, शिवाय उद्धव यांना संसदीय शिष्टाचार देखील माहिती नव्हते. प्रश्र्नावर त्यांची अजिबात मांड नव्हती. अडीच वर्षाच्या काळात उद्धव ठाकरे अवघे काही तास मुख्यमंत्री कार्यालयात गेले होते. विधिमंडळात विरोधकांनी विचारलेल्या प्रश्र्नांना समर्पक उत्तर देण्याचे सौजन्य देखील उद्धव यांनी कधी दाखवले नाही. उद्धव यांच्या मर्यादांवर शरद पवार यांनी लोक माझे सांगाती या पुस्तकात मार्मिक भाष्य केले आहे. दोन वर्षात उद्धव ठाकरे काही तास मुख्यमंत्री कार्यालयात गेले. ही बाब आमच्या अनुभवी लोकांच्या पचनी पडणारी नव्हती अशा शब्दात शरद पवार यांनी उद्धव यांची शाळा घेतली होती.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या बाबतीत सर्वात कमकुवत कामगिरी उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची आहे. या निवडणुकीत ज्या घडामोडी घडल्या त्यातून हेच स्पष्ट होते की काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांनी स्वतः च्या विस्तारासाठी उद्धव ठाकरे यांचा वापर करून घेतला आहे. एकीकडे काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने ठाकरेंपेक्षा कमी जागा लढवून सुद्धा जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणले तर दुसरीकडे ठाकरेंना मात्र अपेक्षित यश मिळालं नाही. काँग्रेस आणि राष्ट्रवादीची मते म्हणावी तशी ठाकरेंच्या उमेदवाराला ट्रान्सफर झालीच नाही. त्याउलट शिवसैनिकांनी मात्र आघाडी धर्म पाळून काँग्रेस राष्ट्रवादीला मदत केली आणि त्यांचे जास्तीत जास्त खासदार निवडून सुद्धा आणले. लोकसभा निवडणुकीत काँग्रेस राष्ट्रवादीने जी दगाबाजी केली त्याचीहक पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत होण्याच्या शक्यतेमुळे उद्धव ठाकरे चिंतेत आहेत.

त्यामुळेच कि काय उद्धव ठाकरें मुख्यमंत्री पदासाठी फिल्डिंग लावायला निवडणुकीआधीच दिल्लीत गेले मात्र तिथेही त्यांना अपशय आल. काँग्रेस आणि गांधी परिवाराचे निष्ठावंत, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार घोषित करण्याची परंपरा नाही, असे थेट सांगून उद्धव यांच्या शिडातील हवाच काढून घेतली आहे. ज्याच्या पक्षाला जास्त जागा, त्याचा मुख्यमंत्री असे चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे. शरद पवार यांनीही उद्धव यांच्या मुख्यमंत्रीपदाबाबत तशीच भूमिका घेतली आहे. काँग्रेस राष्ट्रवादी (शरद पवार) गटात वाहत असलेल्या वार्यांची दिशा पाहून संजय राऊत यांनीही आपली तलवार म्यान केली आहे.

सत्ता मिळण्याची आशा होती तेव्हा उद्धव हे काँग्रेस राष्ट्रवादीसाठी महत्वाचे होते. पण आता मात्र उद्धव ठाकरेंचा महत्व न देण्याचे कदाचित काँग्रेस राष्ट्रवादीने ठरवल्याचे दिसत आहे. सांगली लोकसभा मतदारसंघात उद्धव यांनी आपल्या पक्षातून चंद्रहार पाटील यांना परस्पर उमेदवारी जाहीर केली त्यांच्या विरोधात काँग्रेसचे विशाल पाटील यांनी बंडखोरी केली आणि विशाल पाटील निवडून देखील आले. नुकत्याच झालेल्या विधान परिषद निवडणुकीत शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील यांना शरद पवार यांनी पाठींबा दिला होता. मात्र उद्धव ठाकरे यांनी परस्पर आपले स्वीय सचिव मिलिंद नार्वेकर यांचा अर्ज भरला आणि नार्वेकर निवडून आले. शरद पवार यांच्या उमेदवाराला त्यामुळे नामुष्की पत्करावी लागली. पवार यांनी घडल्या प्रकारावर जाहीर नाराजी व्यक्त केली.

उद्धव ठाकरे यांना सोबत घेऊन काँग्रेस आणि राष्ट्रवादीने न मिळणारी सत्ता तब्बल अडीच वर्षे उपभोगली. आपापले पक्ष भक्कम केले. रसद जोडली. उद्धव यांच्या कार्यकर्त्यांना आणि पदाधिकार्यांना पालख्या वाहाव्या लागल्या. पक्ष उद्धव ठाकरे यांचा फुटला. लोकसभा निवडणुकीत उद्धव यांची मते काँग्रेस राष्ट्रवादीने खेचून नेली. बदल्यात उद्धव यांना कटोरा दिला. आता विधानसभेच्या तोंडावर उद्धव यांना अधिकाधिक कमजोर करून जास्तीच्या जागा पदरात पाडून घ्यायच्या हा काँग्रेसचा डाव आहे आणि त्या डावाला शरण जाण्याशिवाय उद्धव यांना अन्य कोणताही पर्याय उरलेला नाही असच सध्याचे राजकीय चित्र आहे.

## ऐन सणासुदीत

दर दिवसेंदिवस वाढत आहे. कांद्याची विक्री देखील मोठ्या प्रमाणात होती. परंतु आता कांद्याचे दर कमी झाल्याने विक्री देखील कमी होत आहे. आणि दरात देखील वाढ झालेली आहे. किरकोळ बाजारात कांद्याचे दर हे सध्या ८० रुपये किलोवर आहेत. तर काही ठिकाणी २७ रुपयांपर्यंत स्वस्त दराने देखील कांदा विकला जात आहे. १० सप्टेंबर रोजी देशभरात कांद्याची सरासरी किरकोळ किंमत ४९ रुपये प्रति किलो दर एवढी होती. त्याचप्रमाणे शहरानुसार कांद्याच्या दरांमध्ये कमी अधिक प्रमाणात फरक दिसत आहे.

सरकारी संस्था तसेच एनसीसीएफ आणि नाफेडकडून स्वस्त दरात कांदा विकला जात आहे. तसेच मोबाईल द्वारे या कांद्याची विक्री देखील होत आहे. सध्या सहकारी संस्थांकडे ४.७ लाख टन कांदा आहे. जर सरकारने या संस्थांनी सवलतीच्या दरात कांद्याची विक्री केली तर त्यांच्या किमतीवर नियंत्रण ठेवणे सोपे होईल.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पुणे मेट्रो विरोधात सार्वजनिक गणेश मंडळांचे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** गणेशोत्सव सोहळ्याची धामधूम पुणे शहरात पाहायला मिळते आणि गणेशोत्सवाचा शेवटचा टप्पा म्हणजे अनंत चतुर्दशीच्या दिवशी पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर मिरवणूक पाहायला मिळते. आता याच मिरवणुकीला अडथळा निर्माण झाल्याचं दिसून येते. पुण्यातल्या जंगली महाराज रोडवरील संभाजी महाराज उद्यानासमोरील मेट्रो प्रशासनाने पादचारी पूल बांधला आहे. या पुलामुळे गणेशोत्सवाच्या मिरवणुकीला अडथळा निर्माण होत असल्याने पुण्यातील सार्वजनिक गणेश मंडळांनी या पदचारी पुलाखाली आज आंदोलन केले. आम्ही पर्यायी मार्गाचा स्वीकार करणार नाही, असं स्पष्ट वक्तव्य आंदोलकांनी केलं.

### मिरजोळे येथे पाडावे कुटुंबियांनी चलचित्राच्या माध्यमातून देखावा साकारत दिला प्लास्टिक मुक्तीचा संदेश



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** कोकणात घरगुती गणपती उत्सवांची मोठी परंपरा आहे. मोठ्या उत्साहात, आनंदात गणेशोत्सव साजरा केला जातो. गणपतीसाठी वेगवेगळे आकर्षक देखावे साकारले जातात. असाच एक आकर्षक देखावा रत्नागिरीतील मिरजोळे गावातील श्रीकांत पाडावे आणि कुटुंबियांनी साकारला आहे. गणपतीसाठी साकारलेल्या देखाव्यातून पाडावे कुटुंबियांनी एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. चलचित्राच्या माध्यमातून प्लास्टिकचे दुष्परिणाम पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्लास्टिक न वापरता कापड, कागदाचा वापर करावा आणि इको फ्रेंडली वातावरणात गणेशोत्सव साजरा करावा असा संदेश पाडावे कुटुंबाने दिला आहे.

### लिव्ह-इन-रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या प्रेयसीची हत्या करून रिक्षात ठेवला मृतदेह, प्रियकर फरार

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पिंपरी- चिंचवडमध्ये प्रेयसीचा गळा आवळून मृतदेह तरुणीच्या आईच्या घरासमोर रिक्षात ठेवून प्रियकर फरार झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना रात्री बारा ते पहाटे तीनच्या दरम्यान घडली आहे. अशी माहिती वाकड पोलिसांनी दिली. शिवानी सुपेकर असे हत्या झालेल्या तरुणीचे नाव आहे. शिवानी आणि संशयित प्रियकर विनायक आवळे गेल्या दोन वर्षापासून लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हत्या झालेली शिवानी गेल्या एक- दोन वर्षापासून विनायक आवळे सोबत लिव्ह इन रिलेशनशिप मध्ये राहत होती. मंगळवारी रात्री दोघांमध्ये किरकोळ वाद झाले. याच रागातून विनायकने शिवानीचा गळा आवळून हत्या केली. मग, मृतदेह रिक्षात ठेवून तिच्या आईच्या घरासमोर रिक्षा लावला. आज सकाळी ही घटना उघडकीस आली आहे. आरोपी प्रियकर रिक्षा चालक असून तो फरार आहे. त्याचा शोध सुरू आहे, अशी माहिती वाकड पोलिसांनी दिली आहे.

### राणा दग्गुबतीनं केला शाहरुख खानच्या पायाला स्पर्श; आता व्हिडिओ होत आहे व्हायरल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता शाहरुख खान बऱ्याच दिवसांपासून आयफामध्ये दिसला नव्हता, मात्र यावेळी त्याची जादू पुन्हा एकदा त्याच्या चाहत्यांना पाहायला मिळणार आहे. १० सप्टेंबर रोजी मुंबईत २४ व्या आयफा पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यावेळी शाहरुख खान आयफा २०२४ (खखऋअ) होस्ट करणार आहे. यासाठी एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली, यामध्ये किंग खान, करण जोहर, अभिषेक बॅनर्जी, राणा दग्गुबती आणि सिद्धांत चतुर्वेदी, यांसारखे अनेक स्टार्स उपस्थित होते. या कार्यक्रमात सर्व स्टार्स हसताना आणि विनोद करताना दिसले.शाहरुख खाननं सांगितलं नव्या पिढीबद्दल : या कार्यक्रमात शाहरुखचा सेन्स ऑफ ह्युमर पुन्हा स्टेजवर पाहायला मिळाला. यावेळी 'किंग खान'नं आजच्या नव्या पिढीची मजेशीरपणे खिल्ली उडवली, हे ऐकल्यानंतर राणा दग्गुबतीला त्याच्या पायला स्पर्श करुन आशीर्वाद घ्यावा लागला. या कार्यक्रमात सिद्धांत आणि अभिषेक हे 'किंग खान'च्या पायांना स्पर्श करतात. यानंतर शाहरुख नवीन पिढीची खिल्ली उडवतो. नव्या पिढीबद्दल बोलताना शाहरुखनं म्हटलं, ''नवीन पिढी ही स्वतःच्या पाया पडते. जुन्या पिढीमधील मुलं आदर देखील करतात, पण वेगळ्या प्रकारे करतात. (शाहरुख हा करणच्या पायाला स्पर्श करतो. यानंतर तो स्वतःच्या पायाला हातानं स्पर्श करतो.) या गोष्टीवर तिथे उपस्थित असलेले लोक सर्व हसतात.

# पांढरकवडा पोलिसांची गोवंश तस्करी व मांस वाहतुकीवर मोठी कारवाई; १.२२ कोटींचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**पांढरकवडा/प्रतिनिधी :** दि. १० सप्टेंबर रोजी पहाटे ५ वाजता पांढरकवडा पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे नागपूर- हैदराबाद मार्गावर गोवंशीय जनावरे अवैधरित्या कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याचा संशय व्यक्त झाला. या माहितीवरून तातडीने पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर यांनी त्यांचे पथक तैनात केले. पथकाने पिंपळखुटी चेकपोस्टवर नाकेबंदी करून संशयित वाहने अडवून तपासणी केली. तपासणीदरम्यान वेगवेगळ्या घटनांमध्ये एकूण ६४ गोवंशीय जनावरे आणि १५,००० किलो गो आणि म्हशीचे मांस सापडले, ज्यांची एकूण किंमत ३९ लाख रुपये इतकी आहे. याशिवाय, वाहतूकीसाठी वापरलेली ५ आयशर ट्रक आणि टेम्पोही जप्त करण्यात आले, ज्यांची किंमत ८३ लाख रुपये आहे. तसेच आरोपींकडून १२ मोबाईल फोन जप्त करण्यात आले, ज्यांची किंमत ९३,००० रुपये आहे.

ऐकून पाच कारवाया करण्यात आल्या पहिल्या गुन्ह्यात सफीर बेग मुस्ताक अहेमद, अब्दुल अश्फाक कुरेशी, आणि मोहम्मद सलीम कुरेशी (सर्व रा. नागपूर) यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला असून, १४ गोवंशीय जनावरे, एक आयशर ट्रक आणि दोन मोबाईल फोन असा एकूण १९.४३लाख रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त झाला. दुसऱ्या गुन्ह्यात फिरोज खान, अहेफाज अहेमद कुरेशी, आणि मोहम्मद सलीम कुरेशी (सर्व रा. नागपूर) यांच्याकडून ८ गोवंशीय जनावरे, एक आयशर ट्रक आणि दोन मोबाईल फोन असा एकूण १८.४९लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तिसऱ्या गुन्ह्यात मोहम्मद आसीफ तुफानी, समीर खान, आणि मिनाज खान (रा. नागपूर आणि शिवणी, मध्यप्रदेश) यांच्याकडून १५,००० किलो गो आणि म्हशीचे मांस, एक टेम्पो आणि तीन मोबाईल असा ४६.२७ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौथ्या गुन्ह्यात मोहसीन कुरेशी, शहाबुद्दीन कुरेशी, आणि फैजान कुरेशी (रा. नागपूर आणि गोंदिया) यांच्यावर गुन्हा नोंदवून ८ गोवंशीय जनावरे, एक आयशर ट्रक आणि दोन मोबाईल असा १८.४३ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पाचव्या गुन्ह्यात मोहंमद नवाज, मोहंमद शमशोददीन, शेख रशीद आणि शेख समीर (सर्व रा. हैदराबाद) यांच्याकडून ३४गोवंशीय जनावरे, एक टेम्पो आणि चार मोबाईल असा २०.३१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या पाचही गुन्ह्यांत आरोपीविरुद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम आणि भारतीय दंड संहिता अंतर्गत विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईत एकूण ६४ गोवंशीय जनावरे, १५,००० किलो गो आणि म्हशीचे मांस, ५ वाहने आणि १२ मोबाईल फोन असा एकूण १ कोटी २२ लाख ९३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरची कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक पियुष जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्र्वर वेंजने, आणि पांढरकवडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक दिनेश झांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर आणि त्यांच्या पथकातील पोलीस कर्मचारी मारोती पाटील, सचिन काकडे, राजु बेलयवार, छंदक मनवर, राजु मुत्यालवार आणि गौरव नागलकर हे होते



## बोलेरोची ट्रकला धडक; ३ तरुण जागीच ठार, गावावर शोककळा

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** देवगड-निपाणी राज्य महामार्गावर बोलेरोची ट्रकला धडक बसून भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच गावातील तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला तर चौघे गंभीर जखमी झाले आहेत. सर्वजण सोळांकूर गावचे असून ऐन गणेशोत्सवात झालेल्या या अपघाताने गावात शोककळा पसरली आहे.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, राधानगरी तालुक्यातल्या सरवडे-मांगेवाडी इथं शिवमुद्रा हॉटेलजवळ रात्री साडे बारा वाजता बोलेरो गाडीने ट्रकला धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की बोलेरोचा चक्काचूर झाला आहे. अपघातात चौघे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर कोल्हापुरात उपचार केले जात आहेत.

अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे शुभम धावरे, आकाश परीट, रोहन लोहार अशी आहेत. तर ऋत्विक पाटील, सौरभ तेली, भरत पाटील, संभाजी लोहार हे गंभीर जखमी झाले आहेत. गारगोटीहून सोळांकूरला येत असताना बोलेरोची कोकणातून येणाऱ्या ट्रकला धडक दिली.

अपघातानंतर ट्रकचालक घटनास्थळावरून फरार झाला. यात चालकही गंभीर जखमी झाला आहे. जखमींना घेऊन जात असताना रुग्णवाहिकेतील लोकांनी ट्रक ओळखला आणि ट्रक चालकाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिलं. अपघातात मृत्यूमुखी पडलेल्यांचे मृतदेह शवविच्छेदन करून कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आलं. गणेशोत्सवात घडलेल्या या घटनेने गावावर शोककळा पसरलीय. गावातील सर्व व्यवहार बंद ठेवून अपघातातील मृतांना श्रद्धांजली वाहिली.


सोळांकूर गावातले ६ जण कामासाठी गारगोटीला गेले होते. काम आटोपून ते रात्री उशीरा घरी येताना मुदाळ तिठ्ठ्यावर संभाजी लोहार हे त्यांच्या गाडीत बसले. तिथून पुढे आल्यावर रस्त्यातच हा भीषण अपघात झाला. अपघातानंतरचं दृश्य अंगावर काटा आणणारं होतं. अपघाता बोलेरो चालक शुभम धावरे याचं शीर धडावेगळं झालं होतं.

## कृषी क्षेत्रातही होणार एआय चा वापर

### कृषी विद्यापीठाने बी.एसस्सी ॲग्री विद्यार्थ्यांसाठी घेतला मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** आजकाल कृषी शिक्षणात खूप मोठे बदल झालेले आहे. विद्यार्थ्यांना नवनवीन प्रयोग शिकवले जातात त्याचप्रमाणे शेतीतील गोष्टी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सुलभ पद्धतीने करता येईल. अशातच आता B.sc Agri विद्यार्थी यांना AI, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्सचा अभ्यास देखील शिकवला जाणार आहे. याबाबत विद्यार्थ्यांना कृषी विद्यापीठांमध्ये पदवीचे पर्याय देखील मिळणार आहेत. कृषी शिक्षणात आता भारतीय कृषी संशोधन परिषदेने एक नवीन गोष्ट आणली आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रात भव्य करियर करण्याच्या विद्यार्थ्यांना खूप स्कोप मिळणार आहे. कारण आता बीएससी एग्रीकल्चरचे विद्यार्थी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या प्रगत विषयांचा देखील अभ्यास करणार आहेत. जेणेकरून त्यांना नवीन तंत्रज्ञानाची देखील माहिती मिळेल आणि या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून त्यांना शेती करता येईल.



भविष्यातील गरजा पाहता कृषी शिक्षणात एक मोठा परिवर्तन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना आता मल्टिपल एंट्री आणि एक्झिट पोलिसीचा देखील लाभ मिळणार आहे. म्हणजेच विद्यार्थ्यांना एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेत सहजपणे बदली करता येणार आहे. तसेच पदवीचे स्वरूप देखील बदलण्यात येणार आहे. ग्रॅज्युएशनच्या पहिल्या वर्षानंतर बाहेर पडणारे विद्यार्थी आता दहा आठवड्याच्या इंटरशिप नंतर UG प्रमाणपत्र देखील प्राप्त करू शकतील. तर दुसऱ्या वर्षानंतर पदवी सोडणारे विद्यार्थी हे UG डिप्लोमा प्राप्त करण्यासाठी देखील सक्षम असतील.

उपमहासंचालक (कृषी शिक्षण) डॉ. आर.सी. अग्रवाल म्हणाले की, कृषी शिक्षण हे केवळ पारंपारिक पद्धतींवर आधारित नसून विद्यार्थ्यांना उद्योजकता आणि रोजगाराच्या नवीन संधींशी जोडले जावे, अशी आमची इच्छा आहे. यासाठी विद्यार्थ्यांचे संवादकौशल्य सुधारले जाणार असून, त्यांना नवोपक्रम आणि तंत्रज्ञानाचे प्रशिक्षणही दिले जाणार आहे.

आधुनिक विषयांचा अभ्यास आवश्यक आहे

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा करण्यासाठी, कृषी विद्यापीठांमधील विद्यार्थी आता स्वत: प्रकल्प तयार करतील आणि ICAR कडून त्यांना आवश्यक मदतही पुरविली जाईल. यासोबतच कृषी क्षेत्रातील विविध क्षेत्रातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स आणि मशिन लर्निंग यांसारख्या आधुनिक विषयांचा अभ्यास विद्यार्थ्यांना करणे बंधनकारक असणार आहे.

हे नवे बदल कृषी शिक्षणाच्या क्षेत्रातील एक महत्त्वाचे पाऊल ठरतील आणि तरुण शेतकऱ्यांना नव्या युगातील आव्हानांचा सामना करण्यासाठी तयार करतील. कृषी शिक्षणाला नवी दिशा देण्याचे आश्र्वासन देणाऱ्या या उपक्रमांना कृषी मंत्रालयाकडून मंजुरी मिळताच या अधिवेशनापासून या उपक्रमांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

## अनुदानाची रक्कम तातडीने खात्यात जमा करा

### शिवसंग्रामचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

■ नासीर शेख

**पातूर :** गेल्या वर्षी सोयाबीन कपाशी या पिकाला शासनाकडून समाधानकारक भाव मिळाला नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागला, शेतकऱ्यांना कर्जातून सावरण्यासाठी व नाराजी दूर व्हावी म्हणून शासनाने नुकतेच शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजार रुपयांची मदत देण्याचे जाहीर केले, परंतू अद्यापही शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मिळाली




नाही, सण उत्सहाच्या दिवसात शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात तातडीने जमा करण्यासाठी शिवसंग्रामचे जिल्हा अध्यक्ष दिलीप परनाटे यांनी ९ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकार्यांना निवेदन दिले आहे. अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार याकडे पातुर तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## विष्णू रुपी गरुड पुराण कथेमधील जीवनातील माहिती देणारा खेतवाडी येथे देखावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विष्णू रुपी गरुड पुराण कथेवर या मंडळाकडून गणेश मूर्ती साकारण्यात आली आहे. या मूर्तीचे व देखाव्याचे वैशिष्ट म्हणजे की गणेश भक्तांपर्यंत सामाजिक संदेश पोचवणे अर्थातच सध्या जगात होणाऱ्या वाईट गोष्टी, घटना, महिलांवर होत असलेले अत्याचार, भ्रष्टाचार या सर्व गोष्टी गरुड पुराणामध्ये आहेत. गरुड पुराणामध्ये दाखवल्या प्रमाणे देखावा करण्याचा प्रयत्न केला आहे. ८० हजार युहितून माणसाला जन्म मिळतो तर त्यांनी त्या जनमत सत्कर्म करावं आणि विष्णू त्यांना आशीर्वाद देतात. जर कोणी स्त्रियांचे शोषण केले किंवा महिलांवर अत्याचार केले तर त्यांना गरुड पुराणांमधून काय शिक्षा दिली जाते हे देखील दाखवण्यात आले आहे. एखादा माणूस पैशाच्या लोधापाई लोकांना फसवतात अशा लोकांना गरुड पुराणामध्ये काही शिक्षा आहे ते देखील दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. जन्म मृत्यू मृत्यूनंतर माणसाला कसा यमदूत घेऊन जातात. जेणे करून कोणी पाप करू नये. पाप केल्यावर तुम्हाला काय त्रास होईल.

आताच्या पिढीने धर्मासाठी प्रेरित झाले पाहिजे परंतु या सर्व गोष्टींची माहिती देखील नसते, हे सर्व माहिती असणे तितकेच गरजेचं आहे..या सर्व गोष्टीतून गणेश भक्त चांगल्या गोष्टी शिकतील आणि चांगली कर्म करायला लागतील हे उद्दिष्ट आहे. भारत विश्वचषक जिंकल्याचा आनंद बाप्पाला झाला आणि मूषकराज ट्रॉफी घेऊन खेतवाडीत आला.



वृत्तविशेष...

## पावसामुळे नुकसान झालेल्या नागरिकांना प्रशासनाने मदत करावी; नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे आंदोलन



**गोंदिया/प्रतिनिधी :** गोंदिया जिल्ह्यात मागील दोन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत असल्याने जिल्ह्याला पूर परिस्थिती निर्माण झाली यामुळे अर्जुनी मोरगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले. असून शेतामध्ये पाणी साचले आहे शेतकऱ्यांनी लावलेले पीक मोठ्या प्रमाणात जमीनदोस झाले आहे, शेतकऱ्यांना झालेल्या नुकसान ची भरपाई देण्यात यावी या साठीच माजी जिल्हा परिषद सदस्य किरण कांबळे यांनी अर्जुनी मोरगाव शहर या ठिकाणी ठिय्या आंदोलन करण्यात आले या वेळी आंदोलनात मोठ्या संख्येने महिलांच्या सहभाग होता. मुख्यमंत्री यांच्या नावाने तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. तर येत्या आठ दिवसात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा मोठा आंदोलन व रस्त्यावर उतरण्याच्या इशारा यावेळेस किरण कांबळे यांनी दिला आहे.

## दूध डेरीतील फ्रिज मधून अवैध गुटखा जप्त; रिसोड पोलीसांची लोणी मार्गावर कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** येथील लोणी फाटा येथे दूध डेअरीतून गुटखा विक्री होत असल्याची गोपनीय माहिती रिसोड पोलिसांना मिळताच पोलिसांनी छापेमारी करून डेअरी मध्ये असलेल्या फ्रीज मधून गुटखा जप्त केल्याची घटना किल दिनांक १० सप्टेंबर रोजी संध्याकाळी ५:३० रिसोड पोलिसांनी केली. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार लोणी फाटा येथील स्वराज्य दूध डेअरी येथे गुटखा विक्री होत असल्याच्या गुप्त माहितीवरून रिसोड पोलिसांच्या पथकाने छापीमारी केली असता दुकानात विमल पान मसाला वहा व इतर गुटखा आढळून आल्याने रिसोड पोलिसांनी ३३०० चा गुटखा जप्त करून आरोपी विजय तापडिया यांच्यावर गुटखा प्रतिबंधक कायदे अंतर्गतकलम २२३,२७४,२७५, कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास रिसोड पोलीस स्टेशनचे ठाणेदार भूषण गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक डोंगरे करीत आहेत. रिसोड शहरात गुटख्यावर छापेमारी झाल्याने गुटखा विक्री करणाऱ्या व गुटखा किंग चे धाबे दणाणले आहेत. गुटखा विक्री करणे व बाळगणे कायद्याने गुन्हा असतानाही लोणी फाटा येथे दूध डेअरी च्या नावाखाली गुटखा विक्री होत असल्याने आश्र्चर्य व्यक्त केल्या जात आहे.

## पत्रकारांनी संकल्पनेतून साकारलेल्या इलेक्ट्रॉनिक्स मीडियाच्या भूमिकेतील गणेश मूर्ती ठरत आहे आकर्षक



दैनिक आपला विदर्भ

**खामगाव /प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील पत्रकार गणेशोत्सव मंडळाच्या वतीने मागील वर्षीपासून पत्रकार भवन येथे गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे. मागील वर्षी प्रिंट मिडियाच्या पत्रकाराचे रूपातील मूर्तिची स्थापना करण्यात आली होती.तर यंदा श्री संत गजानन महाराज यांच्या वारीचे वार्तांकन करताना ईलेक्टॉनिक मिडिया पत्रकाराच्या रूपातील गणराय व कॅमेरामन म्हणून मूषकराज अशा संकल्पनेतील गणरायाची स्थापना करण्यात आली आहे. सदर मूर्ती खामगावकरांसाठी आकर्षण ठरत आहे. गणेशोत्सवा दरम्यान पत्रकार बांधवांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## महामार्ग, द्रुतगती मार्गावर २० किमी पर्यंत टोल माफ, फास्टॅगचीही गरज नाही; जाणून घ्या नवीन नियम

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतात रस्ते, महामार्ग व द्रुतगती मार्गाचे बांधकाम वेगाने चालू आहे. देशभर रस्त्यांचे मोठे जाळे तयार केले जात आहे. त्याच गतीने देशात वाहने आणि वाहतूकही वाढत आहे. आता या वाहनांना अधिक गती देण्यासाठी केंद्र सरकारने मोठं पाऊल उचलले आहे. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने जारी केलेल्या नवीन नियमांनुसार तुम्ही महामार्ग व एक्सप्रेस वेवर वाहन चालवत असाल तर २० किमीपर्यंत तुम्हाला कोणताही टोल भरावा लागणार नाही. केंद्र सरकारने ग्लोबल नेव्हिगेशन सॅटेलाइट सिस्टिम (उ‍एए) असलेल्या खासगी वाहनांना २० किमीपर्यंतच्या टोलमधून सूट दिली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने राष्ट्रीय महामार्ग शुल्क नियम २००८ मध्ये संशोधन केलं आहे. त्यानुसार केंद्र सरकारने जीपीएस आधारित टोल प्रणालीला मान्यता दिली आहे. ज्या वाहनांमध्ये जीपीएस प्रणाली असेल त्या वाहनांना आता टोल नाक्यांवर थांबावे लागणार नाही. तसेच त्यांना फास्टॅगचीही गरज भासणार नही. नवीन सॅटेलाइट आधारित प्रणालीद्वारे केवळ वाहनांवरील नंबर प्लेटच्या मदतीने टोल टॅक्स कापला जाईल.

# नगर परिषद रिसोड -नगर पथविक्रेता समिती निवडणूक बिनविरोध

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** नगर परिषद रिसोड च्यावतीने शहरात नगर पथविक्रेता समिती निवडणूक कार्यक्रम निवडणूक ८ पथविक्रेता सदस्य घ्येण्याकरीता निवडणूक कार्यक्रम घोषीत करण्यात आला होता सदर निवडणूक कार्यक्रमाचा निकाल घोषीत करण्यात आला असून तो बिनविरोध झाल्याचे निवडणूक नि र्णय अधिकारी यांनी घोषीत केले.

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियम) अधिनियम–२०१४ अंतर्गत नियम १४ (२) अंतर्गत ८ नगरपथविक्रेता सदस्य समितीमध्ये घ्यावयाचे असून या करीता कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र.काआ/औस/प.वि./जिल्हाधिकारी,वाशिम/काम/आदेश /२०२४/कार्या–९ दि.०२ ऑगष्ट २०२४ चे पत्रान्वये निवडणूक निर्णय अधिकारी पदी श्री सतिश शेवदा,मुख्याधिकारी नगर परिषद रिसोड यांची नियुक्ती करण्यात आली होती त्यानुसार पथ विक्री विनियम अधिनियम–२०१४ अंतर्गत नियम १४ (२) अंतर्गत ८ नगर पथ विक्रेता सदस्यांची पंचवार्षिक निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेणेकरिता निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध केला होता त्यानुसार दिनांक२०/०८/२०२४ रोजी आरक्षणसोडत करण्यात आली आरक्षणानुसार प्रवर्ग निहाय ती पुढील प्रमाणे आहे.

०१.सर्वसाधरण ०३
(०१ महिला राखीव)
०२.अनुसुचित जाती
०१ महिला राखीव
०३.अनुसुचित जमाती
०१ सर्वसाधारण
०४.इतर मागास वर्ग
०१ सर्वसाधारण
०५.अप्लसंख्यांक
०१.सर्वसाधारण
०६.विकलांग
०१.महिला राखीव
एकूण ०८ जागा

याप्रमाणे जागेकरीता निवड णूक नि र्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परि षद रिसोड यांचे कडून नामनिदेर्शन अर्ज मागविण्यात आले होते त्यानुसार ०१. सर्वसधारण प्रवर्गामध्ये ०१.जालींदर नारायण देवकर ०२.प्रभाकर लक्ष्मन सराफ ०३.रेखा गजानन गवळी महिला राखीव ०२.अनुसुचित जाती महिला राखीव प्रवर्गामध्ये–०१.कल्पना कैलास जुमडे ०३.अनुसुचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग –०१.रामकिसन हरीभाउ शिंदे ०४.इतर मागस प्रवर्गामधून–०१.संदीप लक्ष्मनअप्पा सोनटक्के ०५.अल्पसंख्यांक प्रवर्गामधून–०१.सुरज धन्यकुमार आंबेकर यांचे नामनिदेर्शन अर्ज प्राप्त झाले असून छाननी मध्ये पात्र ठरले तसेच सदर उपरोक्त प्रवर्गामधून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त न झाल्यामुळे हे पथविक्रेता सदस्य बिनविरोध निवडून आले तसेच विकलांग/दिव्यांग प्रवर्गामधून एकही नामनिदेर्शन अर्ज प्राप्त न झाल्याने सदर आठ सदस्यापैकी सात सदस्य शहर पथविक्रेता समिती मध्ये पथविक्रेता यांचे कडून बिनविरोध निवडून आले असून विकलांग/दिव्यांग महिला राखीव प्रवर्ग हा रिक्त राहीला.असे श्री सतिश शेवदा निवडणूक निवडणूक अधिकारी पथविक्रेता (उपजिवीका संरक्षण व पथविक्री विनियम)अधिनियम –२०१४ नगर परिषद रिसोड यांनी घोषीत केले. सदर कार्यक्रमा दरम्यान सहा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रफुल काळे सहा.प्रकल्प अधिकारी राजेंद्र पटटेबहादूर, जहीर खान श्रीमती सुरेखा जोगी न.प.अधिकारी कर्मचारी तसेचशहरातील प्रतिष्ठित नागरीक संतोष च–हाटे,अरूण क्षिरसागर,अरून मगर,रायभान जुमडे, सुनिल जुमडे,राहूल जुमडे इत्यादी तसेच वरील उमेदवार उपस्थित होते. विजयी उमेदवाराना बिनविरोध निवडून आल्याचे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले व तसेच विजयी उमेदवाराचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



# एक प्रयत्न जी परंपरा झाली..!!

### महालक्ष्मी पूजणासाठी १६ भाज्याचे वाटप, बोरी सुंदर कांड मित्र परिवार




सोळा भाजी चे वाटप करताना सुंदर कांड मित्र मंडळ

दैनिक आपला विदर्भ

**दारव्ह/प्रतिनिधी :** काही वर्षा पूर्वी सुंदर काड मित्र परिवार, सुंदर कांड करतांना महालक्ष्मी साठी आपण काही कराव असा मानस मनात बांधतात आणि पहिल्या वर्षी प्रयत्न करतात. पाहता पाहता आता तब्बल गत १० वर्षा पासून ही परंपरा झाली. बोरी अरब येथे तब्बल ७० ठिकाणी महालक्ष्मी स्थापन केल्या जाते. १६ भाज्या, केळीचे पान आणि हार ह्या वस्तू आणण्यासाठी मोठी धावपळ करावी लागते. मात्र ती धावपळ सुंदर कांड मित्र परिवाच्यामुळे कमी झाली. सकाळीच ७ वाजता सुंदर कांड मित्र मंडळ बोरी चेंद्रशेखर ज्या भाविका कडे महालक्ष्मी स्थापन आहे तेथे घरपोच सोळा भाज्या, केळीचे पान आणि हार घेऊन पोहचतात. महालक्ष्मी चे दर्शन घेऊन ते प्रत्येक घरी हा वाटपासाठी तरुणाई मोठी उत्सुक असते. सोबतच प्लास्टिक मुक्त उत्सव साजरा करण्यासाठी सुंदर कांड मित्र परिवार आग्रही असतो. प्रत्येक घरी थर्माकोल डोने, प्लास्टिक ग्लास पातरवाडी वापरू नये अशी विनंती करतात. एक छोटासा प्रयत्न कधी परंपरा झाली हे कळलंच नाही. गत दहा वर्षा पासून महालक्ष्मी स्थापना करणारे बोरितील भाविक सोळा भाज्या, हार व केळीचे पान विकत आणत नाहीत. सकाळीच त्यांच्याशी घरी हे सर्व साहित्य मिळत.

**परंपरा कायम ठेऊ – आशिष तिवारी**

आम्ही प्रयत्न केला मात्र ही आता परंपरा झाली. माझे सहकारी सुंदर कांड मित्र परिवाराच्या एकजुटीने हे शक्य झाले. या परंपरेला १० वर्ष झाली. ही परंपरा कायम ठेवण्याचा प्रयत्न आमचा असून यात आणखी काय वाढ़ करता येत असेल तर ते पण करण्याची इच्छा आमच्या सुंदर कांड मित्र परिवाराची आहे.

## मलायका अरोराच्या वडिलांनी उचलले टोकाचे पाऊल, इमारतीवरुन उडी मारुन जीवन संपवले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूड अभिनेत्री मलायका अरोरावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मलायकाचे वडील अनिल अरोरा यांनी टोकाचे पाऊल उचलत उंच इमारतीवरून उडी मारली. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. आज सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. अभिनेता अरबाज खान हा सध्या अरोरा कुटुंबासोबत असल्याची माहिती आहे. अनिल अरोरा यांचे पार्थिव वांद्रे येथील डॉ. भाभा हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले आहे.



मुंबईतील वांद्रे येथील अल्मेडा पार्क या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून उडी घेऊन त्यांनी आत्महत्या केली असल्याचे समोर आले आहे. अनिल अरोरा यांनी आत्महत्या केली असल्याचे समजताच एकच खळबळ उडाली. पोलिसांनी देखील घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना कोणतीही सुसाईड नोट सापडली नाही. अनिल अरोरा यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असून आत्महत्येमागील ठोस कारण समोर आले नाही. मागील वर्षी अनिल अरोरा यांना प्रकृती अस्वास्थामुळे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

## पोलिसांची तत्परता, महिलेसाठी एक पिशवी रक्त हेलिकॉप्टरने पोहोचवले

दैनिक आपला विदर्भ

**गडचिरोली/प्रतिनिधी :** अतिवृष्टीमुळे तीन दिवसांपासून अतिदुर्गम, नक्षलप्रभावित व आदिवासीबहुल भामरागडचा संपर्क तुटलेला आहे. ८ सप्टेंबरला पुरातून वाट काढत एका महिलेची वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रसुती केली होती. मात्र, या मातेला रक्ताची गरज भासली. पुरामुळे सगळ्या वाटा अडलेल्या होत्या. अशा परिस्थितीत ११ सप्टेंबरला पावसाने विश्रांती घेतल्यानंतर सकाळी हेलिकॉप्टरने रक्ताची पिशवी पोहोचवण्यात आली. पूरसंकटात आरोग्य विभागाची तत्परता व 'खाकी' वर्दीने दाखविलेल्या माणुसकीची सध्या सर्वत्र चर्चा आहे.

मंतोशी गजेंद्र चौधरी (२४,रा.आरेवाडा ता. भामरागड) असे महिलेचे नाव आहे. ८ सप्टेंबर रोजी तिला प्रसववेदना जाणवू लागल्या. मात्र, याचवेळी अतिवृष्टीमुळे सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. भामरागडचा संपर्क तुटला होता. मात्र, आरोग्य यंत्रणेने तत्परता दाखवत पुरातून वाट काढत तिला दवाखान्यात आणले. राज्य आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या जवानांनी यासाठी डॉक्टरांची मदत केली. दरम्यान, ९ रोजी मंतोशीची सुरक्षित प्रसूती झाली. दरम्यान, मंतोशीचा बी–न हा रक्तगट आहे. या रक्ताची एक पिशवी तिला चढवण्यात आली होती. मात्र, तिच्या प्रकृतीत सुधारणा होण्यासाठी आणखी एका रक्त पिशवीची गरज होती. पुराने रक्ताची पिशवी भामरागड ग्रामीण रुग्णालयात पोहोचविणे कठीण झाले होते. एकीकडे पूर व दुसरीकडे खराब हवामान यामुळे हेलिकॉप्टरने रक्तपिशवी पोहोचविण्यास अडचण येत होती. अखेर ११ रोजी आकाश निरभ्र होताच गडचिरोलीतून एक पिशवी रक्त घेऊन आरोग्य कर्मचारी भामरागडला रवाना झाले. यासाठी पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी जिल्हा पोलीस दलाचे हेलिकॉप्टर विनाविलंब उपलब्ध करुन दिले. सध्या माता व बाळाची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

# २ आरोपी सापडले, संकेत पळाला, पोलीस स्टेशन कमी पडलं की बावनकुळेंची ताकद जास्त झाली, अंधारेंचा पोलिसांना सवाल

दैनिक आपला विदर्भ



**नागपूर/प्रतिनिधी :** 'लाहोरी रेस्टॉरंट अँड बार'मधून संकेत आणि त्याचे दोन मित्र जेवण करून घरी जात असताना त्यांच्या गाडीने तीन गाड्यांना धडक दिली. अपघातानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करून दोन आरोपींना घटनास्थळी पकडले. मात्र तिथून संकेत पळून गेला, अशी माहिती सीताबर्डी पोलीस निरीक्षकांनी शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे यांना दिली. त्यावर आश्चर्य व्यक्त करीत पोलिसांना दोन आरोपी घटनास्थळी सापडले परंतु संकेत पळून गेला. संकेतला पकडण्यात पोलीस स्टेशन कमी पडले की त्याचे वडील चंद्रशेखर बावनकुळेंची ताकद जास्त झाली, असा खोचक सवाल त्यांनी पोलिसांना विचारला.

नागपूर हिट अँड रन प्रकरणात पोलिसांच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत या प्रकरणातील तथ्ये जाणून घेण्यासाठी शिवसेना उपनेत्या सुषमा अंधारे नागपूरला पोहोचल्या आहेत. बुधवारी सकाळी ११ वाजता त्यांनी सीताबर्डी पोलीस निरीक्षकांना भेटून घटनेच्या कारवाईसंदर्भात माहिती घेतली. अंधारे आणि पोलीस निरीक्षक यांच्यातील संवादावेळी माध्यमांचे प्रतिनिधी देखील तेथे उपस्थित होते. यावेळी अंधारे यांनी एकएका प्रसंगावरून प्रश्न विचारून पोलिसांच्या भूमिकेची चिरफाड केली.


एखादा अपघात घडतो, त्यावेळी गाडीचा नंबर एफआयआरमध्ये नोंदविला जातो. मात्र या प्रकरणात संकेतच्या नावावर असलेल्या गाडीचा नंबर एफआयआरमध्ये नोंदविलेला दिसत नाही, असे अंधारे यांनी विचारल्यावर, पोलीस निरीक्षक म्हणाले–फिर्यादीला संकेतच्या गाडीचा नंबरच माहिती नव्हता. आम्ही ज्यावेळी फिर्याद घेतो त्यावेळी फिर्यादीच्या वर्णनानुसार प्राथमिक गुन्हा नोंद करतो आणि तपासाला सुरूवात करतो.

कोणत्याही अपघातातील गाडी पोलीस स्टेशनला जमा होते. या प्रकरणात संकेतची गाडी गॅरेजला कशी काय गेली? असा प्रश्न अंधारे यांनी विचारला. त्यावर पोलीस निरीक्षकांनी त्यांचा दावा फेटाळला. पोलिसांच्या दाव्यावर अंधारे यांनीही आक्रमक होऊन व्हिडीओ फुटेज दाखवू का? असे विचारले. त्यानंतर पोलिसांनी नरमाईची भूमिका घेतली.

दोन आरोपींची वैद्यकीय चाचणी करण्यात आली परंतु संकेत बावनकुळेंची वैद्यकीय चाचणी का करण्यात आली नाही? असे विचारल्यावर संकेत तिथून पळून गेला होता. १२ तास उलटून गेल्यानंतर वैद्यकीय चाचण्यांचा काहीही उपयोग होत नाही. या कारणामुळे आम्ही संकेतची वैद्यकीय चाचणी केली नाही, असे उत्तर पोलिसांनी दिले.

# सततच्या पावसामुळे मिरची उत्पादनात प्रचंड घट, मिरचीचे दर वाढण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ





**नंदूरबार/प्रतिनिधी :** राज्यातील सर्वात मोठा मिरची उत्पादक जिल्हा म्हणून नंदुरबार जिल्ह्याची ओळख आहे. परंतु यावर्षी मिरची पिकावर सततच्या पावसामुळे आणि ढगाळ वातावरणामुळे विषाणूजन्य रोग व आळीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने मिरची उत्पादनात मोठया प्रमाणात घट होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जवळपास ३५० ते ४०० हेक्टर क्षेत्रावरील मिरची शेतकऱ्यांनी उखडून फेकली आहेत.

नंदुरबार जिल्ह्यात जवळपास सात हजार हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्रावर मिरचीची लागवड केली जाते. यावर्षी जिल्ह्यात झालेला सर्वाधिक पाऊस आणि ढगाळ वातावरण याचा मिरची पिकावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत आहेत. मिरची पिकावर मोठ्या प्रमाणात विषाणूजन्य घुबडा आणि अळीचा प्रादुर्भाव झाल्याने जवळपास ४०० हेक्टर क्षेत्रावरील मिरची शेतकऱ्यांनी काढून फेकली आहे. तसेच हा प्रादुर्भाव वाढत असल्याने आतापर्यंत २ हजार हेक्टर पेक्षा अधिक क्षेत्रावर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्याचा परिणाम उत्पादनावर होताना दिसून येत असून मिरचीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटले आहे.

बाजारात मिरचीला सध्या ४० रुपये प्रति किलोचा दर मिळत असला तरी येणाऱ्या काळात हा दर अजून वाढेल. तर रोजच्या जेवणात महत्त्वाचा घटक असलेल्या चटणीच्या दरातही वाढ होण्याची शक्यता आहे. एकंदरीत मिरची चे प्रमाण घटल्याने सर्वसामान्यांना याचा फटका बसणार आहे.